९४०३६

जा.क्र.उमाशि-२/तक्रार/पुवि/२०१५-१६/
शिक्षक उपसंचालक, पुणे विभाग,पुणे -१
यांचे कार्यालय.
दिनांक : २२/०७/२०१५

प्रति,

मा.आयुक्त शिक्षण
यांचे कार्यालय,पुणे

विषय :- ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची माहिती सादर करणेबाबत

महोदय,

वरील विषयी नम्रतापूर्वक सादर करण्यात येते की, पुणे व पिंपरी चिंचवड शहर इ.११ वी ऑन लाईन प्रवेश प्रक्रियेची आज अखेरची माहिती सोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

आपला विश्वासू

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे - १

# इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समिती, पुणे २०१५-१६

## प्रसिद्धी निवेदन

दिनांक :- २२/७/२०१५

पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता ११ वी चे प्रवेश ऑनलाईन पद्धतीने होत आहेत. ऑनलाईन पध्दतीने इ. ११ वी प्रवेश केंद्रिय प्रवेश समितीमार्फत करण्याचे हे दुसरे वर्ष आहे. सन ऑनलाईन प्रवेशाची चौथी गुणवत्ता यादी केंद्रीय प्रवेश समिती घोषित करीत आहे.

इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेद्वारा प्रथम द्वितीय व तृतीय फेरीमध्ये प्रवेश दिलेल्या व प्रत्यक्ष प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

| तपशील | प्रवेश संख्या | बेटरमेंट दिलेले | एकूण | प्रत्यक्ष झालेले प्रवेश | राहिलेले प्रवेश |
|---|---|---|---|---|---|
| पहिल्या फेरीत प्रवेश दिलेले विद्यार्थी संख्या | 55020 | -------- | 55020 | 41805 | 12211 |
| दुस-या फेरीत प्रवेश दिलेले विद्यार्थी संख्या | 3613 | 9102 | 12715 | 2740 | 8598 |
| तिस-या फेरीत प्रवेश दिलेले विद्यार्थी संख्या | 4881 | 7215 | 12096 | 3902 | 3853 |
| चौथ्या फेरीत प्रवेश दिलेले विद्यार्थी संख्या | 1382 | 5757 | 7139 | 0 | 1 |
| एकूण | 65053 | 22074 | 86970 | 48447 | |

एकूण १३८२ विद्यार्थ्यांना चौथ्या फेरीत प्रवेश देण्यात आलेला आहे.

तिस-या फेरीअखेर राहिलेल्या एकूण ३८५३ विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रक्रियेमार्फत सिस्टीमद्वारा दिनांक १६/७/२०१५ व १७/७/२०१५ या दोन्ही दिवशी विद्यार्थ्यांच्या मोबाईलवर २ वेळा एसएमएस पाठविण्यात येवून प्रवेश अर्ज भरण्याबाबत कळविलेले होते. तरीही केवळ १३८३ विद्यार्थ्यांनी त्यांचा Option फॉर्म ऑनलाईन निश्चित केला . त्यातील काहींनी पुन्हा दोन शाखांकरीता अर्ज केलेला आहे. तिस-या फेरीअखेर केंद्रिय प्रवेश समितीकडे शाखानिहाय खालील प्रमाणे जागा रिक्त होत्या.

| शाखा | प्रथम / द्वितीय / तृतिय फेरीअखेर शिल्लक राहिलेल्या जागांचा तपशील |
|---|---|
| कला (मराठी) | 5069 |
| कला (इंग्रजी) | 1726 |
| वाणिज्य (मराठी) | 3797 |
| वाणिज्य (इंग्रजी) | 4201 |
| विज्ञान (इंग्रजी) | 7207 |
| एकूण | 22000 |

इयत्ता ११ वी ऑनलाईन पद्धतीने प्रवेशाची चौथी गुणवत्ता यादी आज जाहिर होत आहे.

- या चौथ्या फेरीत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी दिनांक २२/७/२०१५ व २३/७/२०१५ रोजी त्यांना दिलेल्या कनिष्ठ महाविद्यालयात जावून त्यांचा प्रवेश अंतिमतः निश्चित करावयाचा आहे.
- चौथ्या फेरी अंतर्गत बेटरमेंट (Betterment) ची संधी मिळालेल्या विद्यार्थ्यांनी त्याचा मूळ कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेश रद्द करुन बेटरमेंट (Betterment) मिळालेल्या कनिष्ठ महाविद्यालयात जावून प्रवेश घ्यावयाचा आहे.
- कनिष्ठ महाविद्यालयांनी हया चौथ्या फेरीत प्रवेश बेटरमेंट मिळालेल्या कनिष्ठ महाविद्यालयास विद्यार्थ्यांना जाण्यासाठी त्यांचा आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेश रु.२००/- फी घेवुन तात्काळ रद्द करावयाचा आहे.

या चौथ्या फेरी अखेर इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे काम पूर्ण होत आहे. तथापि खालील नमूद केलेल्या विद्यार्थ्यांनी इ. ११ वी प्रवेश समितीकडे केलेल्या विनंतीचा विचार करुन एक विशेष फरीचे (पाचव्या) नियोजन करण्यात येत आहे.

१. ज्या विद्यार्थ्यांनी अदयापपर्यंत ऑनलाईन फॉर्म भरलेला नाही. त्यांनी रु.१००/- देऊन नवीन माहिती पुस्तिका विकत घेवून ऑनलाईन फॉर्म भरावयाचा आहे. (पार्ट १ व पार्ट २ भरणे आवश्यक आहे.) माहितीपुस्तिका वितरण : दिनांक २३/७/२०१५ व २५/७/२०१५ वेळ सकाळी ११.०० ते ४.०० स्थळ : इ. ११ वी केंद्रिय प्रवेश समिती कार्यालय तथा आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वेरोड, पुणे १

२. ऑनलाईन प्रवेश पद्धतीद्वारा फॅार्म भरलेला होता परंतु सबमिट केलेला नव्हता. (अपूर्ण फार्म भरलेला होता.) त्या विद्यार्थ्यांनी त्यांचेकडे असलेल्या लॉगीन आयडी व पासवर्ड द्वारे तोच फॉर्म संपूर्णतः भरावयाचा आहे व सबमिट करावयाचा आहे.(पार्ट २ - ऑप्शन फार्म)

३. ऑनलाईन प्रवेश पद्धतीद्वारा पहिल्या, दुस-या, तिस-या आणि चौथ्या फेरीनुसार कोठेच प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांनी पुन्हा त्यांचा ऑनलाईन ऑप्शन फॉर्म (पार्ट २) भरावयाचा आहे.

४. प्रथम द्वितीय तृतीय फेरीमध्ये प्रवेश मिळालेल्या परंतू काही कारणास्तव प्रत्यक्ष प्रवेश न घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचा ऑनलाईन ऑप्शन फॉर्म (पार्ट२) पुन्हा भरावयाचा आहे.

५. ज्या विद्यार्थ्यांना शाखा बदल, माध्यम बदल, दूरचे महाविलय इत्यादी कारणास्तव कनिष्ठ महाविद्यालय बदलावयाचे आहे.त्यांनीही पुन्हा ऑनलाईन ऑप्शन फॉर्म (पार्ट२)भरणे आवश्यक आहे.

६. ज्या विद्यार्थ्यांच्या गुणांमध्ये एसएससी बोर्डाकडून पुर्नतपासणीनुसार वाढ झालेली आहे व कनिष्ठ महाविद्यालय बदलावयाचे आहे अशा विद्यार्थ्यांनीही पुन्हा ऑनलाईन प्रवेश करणे आवश्यक आहे. त्या विद्यार्थ्यांनी खालीलप्रमाणे त्यांची माहिती आवश्यक कागदपत्रासह नवीन गुणपत्रिकेसह समितीकडे सदर करावयाचे आहे.

| अ.क्रं. | फॉर्म नं. | नांव | ओरीजनल मार्कस् ५००/ | वाढलेले मार्कस् ५००/ |
|---|---|---|---|---|
| | | | | |

- ज्यांनी अदयाप एकदाही लॉग इन केलेले नाही अशाच विद्यार्थ्यांनी माहिती पुस्तिका घ्यावी.
- आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वेरोड व शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे येथे ज्या विद्यार्थ्यांनी लेखी विनंती/तक्रार अर्ज दाखल केलेले आहेत, त्या विद्यार्थ्यांनी पाचव्या विशेष फेरीमध्ये त्यांचा ऑप्शन फॉर्म (पार्ट २) भरुन सबमीट करावा.
- वरील सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने प्रवेश अर्ज भरणे आवश्यक आहे. मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ही प्रवेश प्रक्रिया संपूर्णतः ऑनलाईन पध्द्तीनेच होणार आहे. सर्वांना या प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश दिले जाणार आहेत याची सर्व विद्यार्थ्यांनी तसेच पालकांनी नोंद घ्यावी.
- रिक्त जागा व कट ऑफ पाहूनच विद्यार्थ्यांनी पसंतीक्रम भरावेत.
- विशेष फेरीमध्ये बेटरमेंट ची संधी देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
- विशेष फेरीनंतर कोणतीही प्रवेश फेरी असणार नाही.
- कनिष्ठ महाविद्यालयाने कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन प्रवेश देवू नयेत.
- पाचवी विशेष फेरी संपल्यानंतर केंद्रिय प्रवेश समितीतर्फे कनिष्ठ महाविदयालयांची प्रवेश तपासणी मोहिम राबविण्यात येणार आहे याची सर्वांनी नोंद घ्यावी.
- काही कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी व राजकीय पदाधिका-यांनी १० % जागा वाढूवन दयाव्यात अशी मागणी केली आहे तथापि रिक्त जागांचा विचार करता जागा वाढवून देण्याची तूर्तास गरज वाटत नाही.

नव्याने लॉग इन करणारे व अप्रूव्हल पेंडींग असणा-या विद्यार्थ्यांसाठी खालील केंद्रावर अप्रूव्हलसाठी सोय केली आहे.

| | |
|---|---|
| अ) महाराष्ट्र बोर्डाचे विद्यार्थी | १. स. प. महाविद्यालय, पुणे ३०<br>२. आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वेरोड, पुणे<br>३. फर्ग्यूसन कॉलेज, पुणे<br>४. साधना कनिष्ठ महाविद्यालय, हडपसर, पुणे<br>५. जयहिंद कॉलेज, पिंपरी, पुणे |
| ब) इतर बोर्डाचे विद्यार्थी | १. मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज, पुणे |

# विशेष फेरीसाठी वेळापत्रक

| अ.क्र. | दिनांक | वेळ | प्रवेश प्रक्रियेबाबत तपशिल |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १ | २३/७/२०१५ ते २५/७/२०१५ | स. ११.०० ते ४.०० | माहितीपुस्तिका विक्रीसाठी फक्त आबासाहेब गरवारे महाविद्यालय कर्वेरोड, पुणे येथे उपलब्ध. (यापूर्वी माहितीपुस्तिका घेतलेली नसल्यास) |
| २ | २४/७/२०१५ | सायं. ५.० वाजता | चौथ्या फेरीनंतरचा रिक्त जागांचा तपशील वेबसाईटवर जाहिर करणे. |
| ३ | २८/७/२०१५ ते २९/७/२०१५ | स. ११ पासून | ऑप्शन फॉर्म भरणे. तसेच नवीन विद्यार्थ्यांनी ॲप्लीकेशन पार्ट १ व पसंतीक्रम पार्ट २ भरणे सबमीट /कर्न्फम करुन प्रिंट घेणे. |
| ४ | ३०/७/२०१५ | | **MKCL Processing** |
| ५ | ३१/७/२०१५ | सकाळी ११.०० वाजता | विशेष फेरी पाचवी गुणवत्ता यादी जाहिर |
| ६ | ३१ जुलै २०१५ व १ ऑगस्ट २०१५ | स. ११.०० ते ४.०० | ५ व्या गुणवत्ता यादीनुसार विद्यार्थ्यांनी प्रवेश घेणे. |

ही केंद्रीय प्रवेश पध्दती कार्यान्वित करण्यात ज्यांची प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या मदत झालेली आहे त्या सर्वांचे इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समितीकडून मन:पूर्वक आभार.

रामचंद्र जाधव
अध्यक्ष
इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समिती
तथा
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१